# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०७ जुलै,२०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची अवैध दारू तस्करांविरूध्द कार्यवाही

## २ गुन्हयात ३७ लक्ष ८५ हजार ६०० रू. चा मुद्देमाल हस्तगत

दिनांक ०७/०७/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कोरपना पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम एका ट्रकने वणी कडुन नांदा फाटा येथे दारूची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सांगोळा फाटा रोडजवळ नाकेबंदी करून वाहने तपसाणी सुरू केली. दरम्यान मिळालेल्या माहितीप्रमाणे एक ट्रक एमएच ३१ सीबी ४७४६ येतांना दिसला. सदर वाहनास थांबवुन वाहनातील मालाबाबत विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये २३९ बॉक्स/प्लास्टीक बॅग मध्ये देशी दारूचा माल किं. २३,१६,०००/—रू चा मिळुन आला. सदर दारूचा माल आणि वाहतुकीकरीता वापरलेले वाहन एमएच ३१ सीबी ४७४६ किं. १०,००,०००/—रू असा एकुण ३३,१६,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन कोरपना येथे नोंद करण्यात आला असुन ०३ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस स्टेशन रामनगर परिसरात नाकेबंदी करून एका चारचाकी हयुंडाई सॅन्ट्रो वाहनास ताब्यात घेवुन वाहनासह एकुण ४,६९,६००/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरचा गुन्हयाचा तपास पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरिक्षक श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनि. सचिन गदादे, सफौ. भोयर, पोना. बल्की, अमजद, पोशि. सतिश, मिलींद, नितीन, संजु आतकुलवार, अमोल धंदरे, प्रशांत नागोसे, गोपाल आतकुलवार यांनी पार पाडली.

———————————————————————————————————